# जनसंपर्क अधिकारी

**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय**

**रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे- ४०११०७**

Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in



स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट २१७-२३** **दिनांक :- १०/०७/२०२३**

## दुचाकीचा आरसा लागल्याच्या किरकोळ कारणावरुन खुन करणाऱ्या तीन अनोळखी आरोपीतांना ०८ तासांत अटक- नालासोपारा पोलीस ठाणेची कामगिरी.

दिनांक ०९/०७/२०२३ रोजी फिर्यादी विकेश रामआशिष चौधरी, रा. नालासोपारा पुर्व यांनी नालासोपारा पोलीस ठाण्यात येऊन तक्रार दिली की, दिनांक ०९/०७/२०२३ रोजी दुपारी ०४.१२ वा.च्या सुमारास फिर्यादी व त्यांचा मित्र रोहित राजेश यादव असे त्यांचे मोटारसायकलवरुन नालासोपारा पश्चिमकडुन नालासोपारा पुर्वेकडे त्यांचे घरी जात असताना नालासोपारा ओव्हरब्रिजवर त्यांचे दुचाकीचा आरसा समोरील स्कुटरवरील इसमास लागल्याने सदर गोष्टीचा राग मनात धरुन स्कुटरवरील अनोळखी तीन इसमांनी फिर्यादीस चेहऱ्यावर व त्यांचा मित्र नामे रोहीत राजेश यादव यास हाताने चेहऱ्यावर, डोकयावर तसेच छाती आणि पोटावर मारहान केल्याने सदर मारहाणीत रोहीत राजेश यादव याचा मृत्यु झाला आहे. सदरबाबत फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरुन नालासोपारा पोलीस ठाणेत गुन्हा रजि. नं. I ३४१/२०२३ भा.दं.वि.सं.कलम ३०२, ३२३, ३४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

नालासोपारा पोलीस स्टेशनच्या कार्यक्षेत्रामध्ये सदर घडलेल्या गंभीर घटनेबाबत वरिष्ठांनी दिलेल्या सुचना व मार्गदर्शनाप्रमाणे गुन्हे प्रकटीकरण पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी गुन्हयाचा तपास सुरु केला. सदर गुन्हा करणारे आरोपीत हे अनोळखी असल्याने त्यांचेबाबत काहीएक माहिती उपलब्ध नव्हती. सदर गुन्हेबाबत तांत्रिक विश्लेषणाव्दारे प्राप्त माहितीच्या आधारे आरोपी नामे १) निलेश गंगाधर पुजारी, २) पंकज अशोक बोरीचा, ३) निलेश रायसाहेब सिंग, सर्व रा. नालासोपारा यांना ताब्यात घेवुन तपास केला असता त्यांनी वर नमुद गुन्हा केल्याचे निष्पन्न झाल्याने सदर अरोपीत यांना दिनांक १०/०७/२०२३ रोजी अटक करण्यात आली आहे. नमुद गुन्हा घडल्यानंतर ०८ तासांच्या आत गुन्हा उघड करण्यात नालासोपारा पोलीसांना यश आले आहे.

सदरची कामगिरी श्री. मधुकर पाण्डेय, पोलीस आयुक्त, श्री. श्रीकांत पाठक, अपर पोलीस आयुक्त, श्री. सुहास बावचे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ ०३, विरार, श्री. चंद्रकांत जाधव, सहायक पोलीस आयुक्त, नालासोपारा विभाग यांचे मार्गदर्शनाखाली नालासोपारा पोलीस ठाणेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. विलास सुपे, पो.नि. श्री.राहुल सोनावणे (गुन्हे), स.पो.नि. पंडीत मस्के, अमोल तळेकर, स.फौ. मंगेश चव्हाण, पो.हवा. किशोर धनु, हिरालाल निकुंभ, पो.ना. अमोल तटकरे, पो.अंम. राजेश नाटुलकर, प्रेम घोडेराव, जगदीश बोरसे, जगदाळे, पो.हवा. ढोणे ( नेमणुक- पोलीस उप आयुक्त कार्यालय परिमंडळ ३, विरार), म.सु.ब. सागर तिरमले, पवन कदम यांनी केलेली आहे.




मिरा-भाईदर-वसई-विरार
पोलीस आयुक्तालय
नालासोपारा पोलीस ठाणे
संपर्क : 0250 - 2402033
संपर्क : 8669604027

**----0000----**